# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com


# बुध्द चरित्र भगवंत कथेची अमृतवर्षा सहकार विद्या मंदिरामध्ये - राधेश्याम चांडक





**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी) :** सद्भावना सेवा समिती आणि सिंहनाद सेवासंघ बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ ते २ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सहकार विद्या मंदिर सभागृहामध्ये महापंडीत पुज्य सध्दर्माचार्य भिक्षु प्रियदर्शी थेरोजी पाली बौध्द साहित्य एवं संस्कृत बौध्द साहित्याचे प्राध्यापक प्रकाण्ड विद्वान प्रांकेलनिया युनिव्हर्सिटी, श्रीलंका यांचे त्रिदिवसीय कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

कथेची वेळ सकाळी ११ ते दुपारी ४ पर्यंत राहील. जगाला शांतीचा संदेश देणारे गौतम बुध्दाचे निष्ठावान अनुयायी भन्ते प्रियदर्शी थेरोजी यांच्या अमृतवाणीतुन बुध्द चरित्र श्रवण करायला मिळणार आहे. बुलडाणा शहरात आणि महाराष्ट्रात प्रथमच अश्याप्रकारच्या कथेतुन बुध्दचरित्रचे आयोजन होत आहे. याचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले.

देश विदेशात प्रियदर्शी थेरोजी यांनी बुध्द चरित्राच्या कथा केल्यानंतर बुलडाणा येथे त्यांचे आगमन होत आहे. आज जगाला युध्द नव्हे बुध्द ची आवश्यकता आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात करोडो वर्षानंतर गौतम बुध्दा सारखे व्यक्तीमत्व जन्माला येते अशा महामानवाचे चरित्र बुलडाणेकरांना श्रवण करायचे भाग्य लाभले आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे असे भावपुर्ण प्रतिपादन भाईजी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सद्भावना सेवा समितीचे सर्व पदाधिकारी आणि सिंहनाद सेवा संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. यामध्ये विजय वाकोडे अध्यक्ष सिंहनाद सेवासंघ, घिरके फुड ॲण्ड ड्रग कमीशनर, समाजभुषण दिलीपभाऊ , सुमित सरदार, शैलेश भंडारे, गजानन जाधव, प्रशांत इंगळे, निवृत्ती सरकटे, सोनाजी दाभाडे, सुरेशचंद्र गट्टाणी, सिध्दार्थ शर्मा, प्रा. प्रकाशचंद्र पाठक यांचा समावेश आहे. तथागत गौतम बुध्दाच्या कथेतुन बुध्दचरित्र या दिव्य सत्संगाचा लाभ प्रकांड विद्वान प्रियदर्शी थेरोर्जीच्या अमृतवाणीतुन घ्यावा असे आवाहन राधेश्याम चांडक यांनी केले आहे.

# कृषि अधीक्षक कार्यालयात शेतकऱ्यांचा ठिय्या...!



**खामगाव (का.प्र.)-** जिल्ह्यात एआयसी पिकविमा कंपनीने गेल्या वर्षीच्या रब्बी हंगामातील पोस्ट हार्वेस्टिंग अंतर्गत पात्र असलेल्या व चुकीचे कारण दाखवून अपात्र केलेल्या १ लाख २६ हजार २६९ शेतकऱ्यांना अद्याप पिकविम्याचा मोबदला दिला नाही. त्याचबरोबर खरीप हंगामात चुकीचे कारणे देवून अपात्र केलेल्या ७० हजार ८३१ शेतकऱ्यांना पिकविमा देण्याचे कंपनीने मान्य केले आहे.

'त्या' शेतकऱ्यांनाही कंपनीने अद्याप पिकविम्याचा मोबदला दिला नाही. पिकविम्यापोटी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २३३ कोटी ८३ लक्ष रु. रक्कम मिळणे अद्याप बाकी आहे. तातडीने ही रक्कम शेतकऱ्यांना मिळावी, अशी आग्रही मागणी आहे. परंतु शासनाकडून उर्वरित हिस्सा मिळाल्यानंतरच या वंचित शेतकऱ्यांची पिकविमा रक्कम जमा करू, असे कंपनीकडून सांगितले जात आहे. त्यामुळे शासनाकडे बाकी असलेला कंपनीचा हिस्सा उपलब्ध करून देत वंचित शेतकऱ्यांना तातडीने विमा रक्कम देण्यासाठी कंपनीला बाध्य करावे, अशी मागणी कृषी मंत्री ना.ॲड.माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली. त्यावर उद्या होणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्याचे आश्वासन कृषी मंत्री महोदयांनी दिले आहे. त्याचबरोबर कॅबिनेट मंत्री ना. आकाश फुंडकर यांच्याशी यासंदर्भात सविस्तर चर्चा केली व उद्या होणाऱ्या कॅबिनेट बैठकीत बुलढाणा जिल्ह्यातील प्रलंबित पिकविम्याचा प्रश्न लावून धरण्याची विनंती त्यांच्याकडे केली.

# प्रदिप गायकी यांना क्रांतीज्योती सावित्रीमाई राष्ट्रीय पुरस्कार



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी):** : कला, साहीत्य, आध्यात्म, नौकरी, कामगार, मराठी चित्रपट निर्मिती या सर्व क्षेत्रात,तथा सामाजिक कार्यात सदा अग्रेसर राहणारे मा. प्रदिप गायकी साहेब (वाहतुक नियंत्रक नांदुरा)यांना करविरनिवासीनी आई महालक्ष्मी माता,राजर्श्री छत्रपती शाहु महाराज यांची , कलानगरी कोल्हापुर येथे ''भारतीय महिला मंच''धम्म चॅरिटेबल ट्रस्टच्या च्या वतीने ५ जानेवारी २०२५ ला ''राष्ट्रीय क्रान्तिज्योती सावित्रीमाई पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार मिळाल्यामुळे निमगांव सह बुलडाणा जिल्ह्याचे नांव या निमित्ताने राष्ट्रीय स्तरावर नेले या अभिमानास्पद कार्याचे सर्व क्षेत्रातुन अभिनंदन होत आहे.एस.टी.महामंडळातील या कर्तव्यदक्ष व्यक्तीला क्रिएटीव्ह हॅन्ड ऑफ महाराष्ट्रा २०२४ हा राज्यस्तरीय व ''राष्ट्रीय क्रान्तिज्योती सावित्रीमाई पुरस्कार २०२५''हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानें एस.टी.महामंडळाचा गौरव वाढवला हे विशेष.या यशाबद्दल गायकी हे आई वडील, गुरु, मित्र,नातलग व सर्व समाजघटकांना ते श्रेय देतात.

# दिव्यांग वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

## राधेश्याम चांडक यांचे लाभणार मार्गदर्शन

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड, शाखा बुलडाणा, बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी म. बुलडाणा व समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग वधु- वर परिचय मेळाव्याचे राधेश्यामजी चांडक उपाख्य भाईजी यांचे मार्गदर्शनात ३१ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हयातील अंध, मुकबधिर व अस्थिव्यंग असलेल्या दिव्यांगांनाही सहजिवन जगण्याचा अधिकार आहे, परंतु माहिती अभावी त्यांना त्यांचा जोडीदार शोधणे अशक्य होते.

यास्तव नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड, शाखा बुलडाणा, बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी म. बुलडाणा व समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यत सैनिक मंगल कार्यालय, बसस्टैंड समोर, संगम चौक, बुलडाणा येथे दिव्यांग वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात दिव्यांगा सोबतच विधवा, घटस्फोटीत व सर्वसामान्य व्यक्ती जे दिव्यांग व्यक्तिबरोबर विवाह करु इच्छितात त्यांनी सुध्दा आपली नोंदणी करुन मेळाव्यास हजर राहण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. या वधु-वर परिचय मेळाव्याकरीता नोंदणी अर्ज खालील ठिकाणी उपलब्ध आहेत व त्याच ठिकाणी नोंदणी अर्ज २५ जानेवारी २०२५ पर्यंत जमा करावयाचे आहेत. १) नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड, शाखा बुलडाणा कार्यालयः गांधी भवन, जयस्तंभ चौक, बुलडाणा २) जिल्हयातील सर्व अपंग शाळा ३) बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी म. बुलडाणा जिल्हयातील सर्व शाखा. ४) सहकार विद्या मंदीराच्या जिल्हयातील सर्व शाळा. अधिक माहितीसाठी संपर्क- मिस्टर. राजेश वैष्णव, कार्यालयीन प्रतिनिधी, मोबा. ९८३४०३१००१, डॉ. व्ही. एस. चिंचोले, सचिव,मोबा. ९८२२६२७२०६ आर.ए. म्हस्के, उपाध्यक्ष, मोबा. ८४८४८७९५५० मिस्टर दिलीप नागरीक, खजिनदार, मोबा. ९४२२१८०५०९ तरी सर्व दिव्यांगासोबतच विधवा, घटस्फोटीत व सर्वसामान्य व्यक्ती जे दिव्यांग व्यक्तिबरोबर विवाह करु इच्छितात त्यांनी या वधु-वर परिचय मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# संविधान आक्रोश मोर्चाने वेधले सर्वांचे लक्ष



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी) -** वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने परभणी येथील संविधान विटंबना तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ जळगाव जामोद शहरातून भव्य असा आक्रोश मोर्चा ६ जानेवारी रोजी काढण्यात आला.

या आक्रोश मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने बहुजन समाजातील महिला पुरुष तरुण नवयुवक, युवती यांचेसह समता सैनिक दलाचे जवान व जळगाव जामोद तालुक्यातील संविधान प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने या मोर्चाला उपस्थित होते.

हा मोर्चा स्थानिक भीम नगर येथुन निघाला त्यानंतर चावडी येथून स्थानिक दुर्गा चौक तहसील चौक व नंतर आंबेडकर चौक येथे मोठ्या जाहीर सभेनंतर संपन्न झाला.

यावेळी वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने राष्ट्रपती व मुख्यमंत्री यांना परभणी संविधान प्रतिकृती विटंबना व सोमनाथ सूर्यवंशी व मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तेच्या निषेधार्थ व त्यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयातील एका व्यक्तीस सरकारी सेवेत सामावुन घ्यावे, सोमनाथ सूर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाखांची आर्थिक मदत द्यावी, संविधान प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्या आरोपींची नार्को टेस्ट करावी, तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेमध्ये केलेल्या वक्तव्याचा सुद्धा त्यांनी ६ जानेवारी २०२५ रोजी जळगाव जामोद तहसीलदार यांना निवेदन देत जाहीर निषेध केला.

या मोर्चाला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा व तालुक्यातील सर्व पदाधिकारी यासह भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी यांचे सह तालुक्यातील बौद्ध उपासक, उपासिका,तरुण युवक, युवती, बहुजन समाजातील महिला पुरुष तसेच संविधान प्रेमी नागरिक हजारोंच्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# मातृतिर्थ पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनी पत्रकारांचा सत्कार



**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी) -** मातृतिर्थ पत्रकार संघाच्या वतीने शहरातील पत्रकार भवना मधे सहा जानेवारी रोजी पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी मातृतिर्थ पत्रकार संघाचे अध्यक्ष संम्मती जैन यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुण कार्यक्रमाला सुरवात झाली. पत्रकार संघातील पत्रकारांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतीमेला हार फुल अर्पण करून अभिवादन केले. तर यावेळी ३० डिसेंबर रोजी साखरखेर्डा येथे उत्कृष्ट पत्रकारीता संम्मान सोहळ्यामधे व्हाईस ऑफ मिडियाचे उपाध्यक्ष मुशिर खान कोटर यांना संत गाडगेबाबा समाज रत्न पुरस्काराने तर सुनिल मतकर यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारीता पुरस्काराने संम्मानीत करण्यात आले होते. त्या अनुषंगाने मातृतिर्थ पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा पत्रकार दिनी सत्कार करण्यात आला.या वेळी व्हाईस ऑफ मिडियाचे उपाध्यक्ष मुशिर खान कोटर यांनी आपले मनोगत व्यक्त केले संचालन व्हाईस ऑफ मिडियाचे तालुका आध्यक्ष अर्जुन कुमार आंधळे यांनी केले. यावेळी मातृतिर्थ पत्रकार संघाच्या संस्थापक आध्यक्षा सुषमा राऊत, पत्रकार संघाचे अध्यक्ष संम्मती जैन, सचीव अशरफ पटेल लोकमत प्रतिनिधि प्रकाश साकला, जुनेद भाई, विलास जगताप, रमेश चव्हाण, चंद्रकांत झिने, पुजा कायंदे यादी पत्रकार उपस्थित होते.

# नांदुरा तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राजेश काजळे उपाध्यक्षपदी प्रवीण डवंगे तर सचिवपदी शैलेश वाकोडे



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी) -** बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाशी संलग्नित नांदुरा तालुका पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण बैठक जिल्हा पत्रकार संघाचे सचिव यशवंतराव पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली तथा मावळते अध्यक्ष विनोद गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तर ज्येष्ठ पत्रकार किशोर खैरे, जगदीश आगरकर, महेश पांडे, सुहास वाघमारे, एकनाथ अवचार यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला शासकीय विश्रामगृह येथे ५ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली होती याप्रसंगी उपस्थित पत्रकार बांधवांमध्ये नूतन कार्यकारिणीच्या निवडीबाबत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात साधकबाधक चर्चा पार पडून २०२५- २६ करिता करिता नूतन तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

त्यामध्ये अध्यक्षपदी राजेश काजळे, उपाध्यक्षपदी प्रवीण डवंगे, सचिव पदी शैलेश वाकोडे, सहसचिवपदी लक्ष्मण वक्टे, कोषाध्यक्षपदी पुरुषोत्तम भातुरकर यांची एक मताने निवड करण्यात आली असून या बैठकीला गोपाल ढगे, प्रशांत ढवळे, वैभव काजळे, मोहन काजळे आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती

# समन्वय अधिकारी, भुसंपादन विभाग,

## जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा

क्रमांक कावि/सअभूस/कयक्ष-७:२/१३९४/२०२४ दिनांक : १८/१२/२०२४

आदेश

विषय :- अरकचेरी बु.ल.पा. प्रकल्प, ता. संग्रमापुर जि. बुलडाणा

प्रकल्पाच्या वळण कालव्याकरीता भूसंपादन प्रकरण क्र ०४/२०२१-२२ मौजे कामोद क्षेत्र ९.०१ हे. आर ता. संग्रामपूर जि. बुलढाणा प्रकरणामध्ये कलम १९ करीता सहा (६) महिने मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ :- १. उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी जळगांव जामोद यांचे पत्र क्र. उविअ जजा /भूसंपादन लि./कावि/९९०/२०२४ दि.१८/१२/२०२४

२. कार्यकारी अभियंता जिगांव प्रकल्प घरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांचे पत्र जा.क्र. ४४२०/अरकचेरी/ सरळखरेदी/रेचिशा-३/२०२४ दि.१६/१२/२०२४

*******

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जामोद यांनी प्रकल्पाच्या वळण कालव्याकरीता भूसंपादन प्रकरण क्र ०४/२०२१-२२ मौजे कामोद क्षेत्र ९.०१ हे. आर ता. संग्रामपूर जि. बुलढाणा प्रकरणामध्ये कलम १९ करीता सहा (६) महिने मुदतवाढ मिळणेबावत प्रस्ताव संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये सादर केलेला आहे.

सदर प्रकरणात संदर्भ क्रमांक २ नुसार कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांचे पत्र दिनांक १६/१२/२०२४ नुसार, सदर प्रकरणात कलम ११ ची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणात वळण कालवा किंवा भूमिगत कालवा करण्याबाबतचा निर्णय अदयाप स्थगित ठेवण्यात आला आहे. सदर बाब वरिष्ट स्तरावर विचाराधीन असल्यामुळे भूसंपादन प्रकरण ०४/२०२१-२०२२ मौजे कामोद ता. संग्रामपुर जि. बुलढाणा या प्रकरणास पुढील कार्यवाही करिता सहा (६) महिण्याची मुतदवाढ देण्यात यावी सदर प्रकरण दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी व्यपगत होत आहे त्याकरीता सदर अशी संदर्भिय पत्र १ व २ नुसार विनंती केली आहे.

ज्याअर्थी, भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पादर्शकतचा राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ (७) नुसार जेव्हा प्राथमिक सुचनेच्या तारखेपासुन १२ महिन्याच्या कालावधीत पोट कलम १ मध्ये कोणतीही घोषणा प्रसिध्द केलेली नसेल तेव्हा अशी घोषणा रह करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. परंतु या पोट कलमात निर्दिष्ट केलेला कालावधी मोजताना कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाव्दारे दिलेली कोणतीही स्थगीतीमुळे किंवा मनाई हुकुमामुळे जमिन संपादनाची कार्यवाही थांबलेली होती असा कोणताही कालावधी वगळण्यात येईल किंवा असे कोणतेही कालावधी वगळण्यात येईल किंवा असे कोणतेही कालावधी वगळण्यात येतील.

परंतु आणखी असे की, समुचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिण्याच्या वाढ करण्याचा अधिकार असेल, अशी तरतुद आहे.

त्याअर्थी भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ (७) नुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक ०४/२०२१-२२ मौजे कामोद ता. संग्रामपूर जि. बुलडाणा क्षेत्र ९.०१ हे. आर या भूसंपादन प्रकरणांस कलम १९(१) ची अधिसुचना घोषित करण्यास सहा (६) महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे.

स्वा-
(सदाशिव शेलार)
जिल्हाधिकारी बुलडाणा

जिमाका/बुल/जाहि/१५९/२०२५

महासागर
मंगळवार दि.७ जानेवारी २०२५
खामगाव (बुलडाणा)


# प्रा.वनिता बोदडे आचार्य पदवीने सन्मानित



**खामगाव (का.प्र.) :-** श्रीमती सुरजदेवी रामचंद मोहता महिला महाविद्यालय खामगाव येथे कार्यरत असलेल्या प्रा.वनिता किसनराव बोदडे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने गृहअर्थशास्त्र विषयात एचडी (आचार्य) पदवीने सन्मानित केले आहे. त्यांचा संशोधनाचा विषय, 'विदर्भातील खामगाव तालुक्यातील ग्रामीण व शहरी विभागात वास्तव्यास असणाऱ्या वृद्धांच्या विविध समस्यांचे तुलनात्मक अध्ययन' हा होता. त्यांचे संशोधन डॉ. मेधा देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले

# भोनगाव मध्ये गावकऱ्यांनी केला आदर्श सुपुत्रांचा सत्कार



**शेगाव (महासागर प्रतिनिधी) :** भोनगाव निवासी अनिल उंबरकर व नारायण दाभाडे यांनी पत्रकारिता क्षेत्रात राज्यस्तरावर नावलौकिक मिळविला. पर्यायाने गावाचाही नावलौकिक वाढविला असल्याचे गौरवोद्गार शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशन चे ठाणेदार प्रवीण लिंगाडे यांनी येथे काढले.

## गावाचा नावलौकिक वाढविला – ठाणेदार प्रवीण लिंगाडे

पोलिस वर्धापन दिनानिमित्त ठाणेदार प्रवीण लिंगाडे, डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल नारायण दाभाडे तसेच मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अनिल उंबरकर यांचा पत्रकार दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय व गावकर्यांच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित केला होता. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी रामदास शेळके, विलासराव शेळके, सत्यनारायण राठी,युवा सेना तालुकाध्यक्ष उमेश शेळके,अनिल शेळके, सत्यवान मोरखडे, अनंता शेळके, प्रविण कोल्हे, राहुल मुर्हे, वैभव पातोंडे, अनिल राजगुरे, तुळशीराम रताळे, रमेश भगत, अर्जुन मोरखडे, तानाजी आमुरकार, आशिष पांडे, विठ्ठल भामद्रे , संजय आमुरकार, गजानन रताळे, साहेबराव दाभाडे, अमोल शेळके, विनोद शेळके, अमोल मोरखडे,शिवाजी अढाव आदीसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचलन लक्ष्मणराव गवई यांनी केले.

# खामगाव प्रेस क्लबचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

## राजेश राजोरे यांना 'खामगाव रत्न', संत निरंकारी मंडळाला ' खामगाव गौरव', श्रीधर ढगे यांना 'स्व.बिन्नीवाले पत्रकारिता',तर सिध्दांत उंबरकर यांना 'युवा पत्रकार प्रेरणा पुरस्कार'







**खामगाव (महासागर प्रतिनिधी) :** मराठी पत्रकार दिनानिमित्त ६ जानेवारी रोजी खामगाव प्रेस क्लबच्या वतीने विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यंदाचा खामगाव रत्न' हा मानाचा पुरस्कार पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करुन खामगावचे नाव संपूर्ण देशात पोहचविणारे ज्येष्ठ पत्रकार दैनिक देशोन्नतीचे आवृत्ती संपादक राजेश राजोरे यांना प्रदान करण्यात आला.

तर अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संत निरंकारी मंडळाला 'खामगाव गौरव' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तसेच ऑन टाईम टुडे मीडिया चे संपादक श्रीधर ढगे यांना 'स्व. बाळासाहेब 'बिन्नीवाले' पत्रकारिता पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तर मागील दोन वर्षापासून सुरु करण्यात आलेला 'युवा पत्रकारिता प्रेरणा पुरस्कार' दैनिक सकाळचे प्रतिनिधी सिध्दांत उंबरकार यांना प्रदान करण्यात आला. स्थानिक पत्रकार भवन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खामगाव प्रेस क्लबचे अध्यक्ष किशोर आप्पा भोसले हे होते.

मंचावर राज्याचे कामगार मंत्री अॅड. आकाशदादा फुंडकर, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, अप्पर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, वंचितचे अशोकभाऊ सोनोने यांच्यासह पत्रकार बांधवांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सर्व सत्कारमुर्तीनी सत्काराला उत्तर देतांना मनोगत व्यक्त केले. तर उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत सत्कारमुर्तीचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन संभाजी टाले यांनी तर आभार प्रदर्शन अनिल खोडके यांनी केले. या कार्यक्रमाला शहरातील प्रतिष्ठीत नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी व पत्रकार बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



**बुलढाणा (जिमाका) :** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना आज जिल्हा माहिती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आचार्य जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले दर्पण नावाचे नियतकालीक सुरू केले. त्यानिमित्ताने दर्पण दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो. यावेळी माहिती सहायक सतिश बगमारे, वरिष्ठ लिपीक प्रतिक फुलाडी, जयंत वानखडे, श्रेया दाभाडकर, लिपीक सौरभ बढिये, प्रमोद राठोड, नामदेव गट्टे, राम पाटील यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**खामगाव (का.प्र.) :-** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये ३ जानेवारी रोजी प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सावित्रीबाईंच्या महान कार्याचा व त्यांच्या विचारांचा परिचय करून देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता देशमुख मॅडम यांनी अतिशय सुरेख पद्धतीने केले. त्यांच्या सुसंस्कृत व नेमक्या निवेदन शैलीने कार्यक्रमात एक वेगळीच ऊर्जा संचारली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक यशवंतजी बोडाडे होते. त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात सावित्रीबाई फुले यांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेतला आणि त्यांनी स्त्री शिक्षणासाठी उभारलेल्या चळवळींचा उल्लेख करत आजच्या पिढीने सावित्रीबाईंच्या विचारांना अनुसरून समाजकार्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

# वै.ह.भ.प. गुरुवर्य मामासाहेब दांडेकर स्मृतिदिन सोहळा

**चिखली (महासागर प्रतिनिधी) :-** वसुधैव कुटुम्बकम' म्हणजेच हे विश्वची माझे घर... ही भावना जोपासणारा वारकरी संप्रदाय हा हिंदू धर्माचा आत्मा असून मानवता धर्म शिकवणारा हिंदू धर्म म्हणजेच सनातन धर्म आहे. इतर धर्मांचा आदर करून स्वधर्म जोपासणे ही शिकवण सनातन धर्म देतो असे प्रतिपादन प.पू. परमहंस परिव्राजकाचार्य श्री श्री १००८ स्वामी हरिचैतन्यानंद सरस्वतीजी महाराज यांनी वै. ह. भ. प. गुरुवर्य मामासाहेब दांडेकर स्मृतिदिन सोहळ्याला निमित्त आयोजित हरिकीर्तन सोहळ्यास उपस्थित भाविक भक्तांना प्रतिपादन केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आदर्श विद्यालय चिखली येथे वै. ह. भ. प. गुरुवर्य मामासाहेब दांडेकर स्मृतिदिन सोहळा शनिवार दिनांक ४ जानेवारी २०२५ ला मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

# पत्रकार दिवसानिमित्त अमन इंग्लिश स्कूल मध्ये पत्रकारांचा सत्कार






**नांदुरा (महासागर प्रतिनिधी) –** ६ जानेवारी रोज सोमवारी पत्रकार दिवसानिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी संस्था अध्यक्ष हाजी मुज़म्मिल अली खान हे होते प्रमुख पाहुणे म्हणून सर्व पत्रकार बांधव संस्था सचिव ऍड. सय्यद सलीम, कलीम मंसुरी, डॉ अनिस अहमद, आसिफ सर, इरफान खान, ईल्यास साहेब व अन्य पालक गण उपस्थित होते य वैतिरिकत शाळेतील विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शन व क्रीडा महोत्सव ही आयोजित करण्यात आला होता. विज्ञान प्रदर्शनी चे उदघाटन हाजी मुज़म्मिल अली खान यांचे हस्ते करण्यात आले व क्रीडा स्पर्धा ला हिरवा झेंडा दाखवण्या चा कार्य पत्रकार बांधवांनी बजावला, ज्या पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला. त्यात नांदुरा शहरातील प्रसिद्ध पत्रकार म्हणून ओळखले जाणारे सुरेश पेठकर, गणेश आसोरे, तुकाराम रोकडे, शैलेश वाकोडे, यशवंतराव पिंगळे, राजेश काजळे, विनोद गावंडे, सेवकराम राजपाल, पुरोषत्तम भातुरकर, गोपाल ढगे, विठ्ठल भातुरकर उपस्थित होते. या कार्यक्रमात अनेक पालक गण सय्यद सलिम, एनुलहक, अ.वहाब, गफुर खान,आमिर खान, अकबर खान, मज़हर खान, सय्यद तजुम्मल, मोहम्मद तौसिफ,. जबिऊल्ला खान, मो.अरशद,शेख अज़िम, शेख सईद, सय्यद नाज़िम, मुबिन खान, शे.बिस्मिल्ला, अनिस ठेकेदार, सय्यद रिज़वान, फरहान खान, शे.नसिर,सय्यद जाबिर, शे.मंजुर, अकिल ठेकेदार, अज़हर सर, अमजद खान, मो.शाकिर, मो.मुशर्रफ व आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी शमशाद परविन, अज़िम सर,शाहिन कमर, मसिरा मैडम , साईमा मैडम, सबा मैडम व अन्य लोकांनी परिश्रम घेतले सुत्र संचालन जमिल खान यांनी केले व आभार अज़िम सर यांनी मानले.

नियमित वाचा
महासागर

# ह्युमन मेटान्यूमो व्हायरस संदर्भात मार्गदर्शक सूचना जाहीर


## नागरिकांनी घाबरुन न जाता सूचनाचे पालन करावे – जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**बुलडाणा (जिमाका) –** चीनमध्ये ह्युमन मेटान्यूमो व्हायरसचा उद्रेक होत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन अर्लट मोडवर असून आरोग्य विभागाने दक्षता घेत पूर्वनियोजन करावे. तसेच आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे नागरिकांनी पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात चीनमध्ये उद्रेक होत असलेल्या मानवी मेटान्यूमो व्हायरस संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले की, सध्या चीनमध्ये ह्युमन मेटान्यूमो व्हायरस उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. ह्युमन मेटान्यूमोव्हायरस तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने जाहिर केलेल्या मार्गदर्शक सूचनाचे पालन केल्यास घाबरण्याचे कोणतेही कारण नाही.

एचपीएमव्हीच्या पार्श्वभूमीवर




बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क असून जिल्ह्यात पुरेशा प्रमाणात औषध साठा, ऑक्सिजन साठा, खाटांची संख्या उपलब्ध आहे. आवश्यकता भासल्यास अधिक खाटांचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच सर्वेक्षणाचे कार्य अधिक गतिमान करुन सर्दी-खोकला अर्थात आयएलआय, सारी रुग्णांचे जलद सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आरोग्य विभागांने देण्यात आले आहे.मानवी मेटान्यूमो व्हायरस सर्वप्रथम नेदरलँडस मध्ये २००१ मध्ये आढळला. मानवी मेटान्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे. ज्यामुळे श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो. या अनुषंगाने डीजीएचएस आणि एनसीडीसी दिल्ली संचालक यांनी मार्गदर्शक सूचना जाहीर केले आहे. यामध्ये खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये ? या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

**काय करावे :** जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा

टिश्यू पेपरने झाकावे. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवावे. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहावे, भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक अन्नाचे सेवन करावे. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्यावी.

**काय करू नये :** हस्तांदोलन, टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर, आजारी लोकांशी जवळचा संपर्क, डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेणे टाळावे.

**लक्षणे:-** सर्दी, ताप, खोकला, शिंका येणे, डोकेदुखी, थकवा हि या आजाराची सर्वसामान्य लक्षणे आहेत. संशयित असलेल्या व्यक्तीचे आजाराचे निदान करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक येथे आरटीपीसीआर, अॅटिजेन नोजल टेस्ट, सीटी स्कॅन व एक्स-रे ह्या तपासण्या उपलब्ध आहेत.

महाराष्ट्रात आतापर्यंत एचएमपीव्हीचा एकही रुग्ण आढळलेला नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. तरी सर्व नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये ? या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. या आजाराची कोणतीही लक्षणे आढळल्यास किंवा काही संशय असल्यास नागरिकांनी घाबरून न जाता त्वरित जवळच्या आरोग्य संस्थामध्ये डॉक्टरांशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.

# खामगाव येथे ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**खामगाव (का.प्र.) –** शिक्षण अधिकारी माध्यमिक जि. प. बुलढाणा यांच्या कार्यालयामध्ये शिक्षण अधिकारी अनिल अकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपशिक्षणं अधिकारी वाघ आणि गायकवाड गट शिक्षण अधिकारी पं.स. खामगावआणि बुलडाणा जिल्हा विज्ञान शिक्षक संघटना अध्यक्ष संजय जारे खामगाव , सचिव खाचने यांचे उपस्थितीत प्रदर्शनासंबंधी नियोजन सभा पार पडली. यावर्षीचे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन जिजाऊ स्कूल ऑफ स्कॉलर आणि गुंजकर सायन्स,कॉमर्स व आर्ट कॉलेज आवार तालुका खामगाव, जिल्हा बुलढाणा येथे ९ व १० जानेवारी रोजी सकाळी ९ ते ५ या वेळेत आयोजित करण्याचे ठरले आहे. कार्यक्रमाला उदघाटक म्हणून ना.प्रतापराव जाधव केंद्रीय आयुष मंत्री भारत सरकार आणि बक्षिस वितरण आणि समारोप कार्यक्रमाला नामदार आकाश फुंडकर कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य हे राहणार आहेत.

## जाहीर नोटीस

वि.व्यवहार न्यायाधिश क.स्तर न्यायालय, नांदुरा –कोर्ट नं. २
एम.जे.सी. नं. २५२/२०२४
चौ.ता.३०/०१/२०२५
अर्जदार करीता अधिवक्ता-
अँड.पवन जी परवाल
अर्जदार - १. रविंद्र सुरेंद्र कोल्हे
रा. कांदीवली पूर्व, मुंबई
२.सौ. रुपाली मिलींद भारंबे
रा. Pioneer DR, Sewickley PA 15143 USA
३. सुमेध सुरेंद्र कोल्हे
रा. नांदुरा खुर्द ता. नांदुरा जि. बुलडाणा
विरुध्द - गैरअर्जदार- कोणी नाही
अर्ज- मुंबई रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट (वारस हक्काचे प्रमाणपत्र) मिळणे बाबत

या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार हयांचे वडील सुरेंद्र सोनाजी कोल्हे हे नांदुरा खुर्द येथील रहिवाशी होते व ते दि.०१.१०.२०२४ रोजी नांदुरा खुर्द येथेच मयत झाले आहेत. मयत सुरेंद्र सोनाजी कोल्हे हयांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच कायदेशिर वारस असल्याबाबतच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार हयांनी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी हया न्यायालयात अर्ज केला आहे. त्या अर्जाची सुनावणी ता३० /०१/२०२५ रोजी १०-३० वाजता होईल.

तरी या जाहीर नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, सदर प्रकरणी ज्यांना काही हरकती, आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी वरील तारखेस किंवा सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसाचे आत वि. न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून त्यांचे आक्षेप, हरकती सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही आक्षेप, हरकत नाही असे समजुन अर्जदारांना वारस हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २१/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
दि.२१/१२/२०२४

शिक्का
आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कोर्ट
नांदुरा, जि.बुलडाणा

## जाहीर नोटीस

वि.व्यवहार न्यायाधिश क.स्तर न्यायालय, नांदुरा
एम.जे.सी. नं. २६०/२०२४
चौ.ता.३/०२/२०२५
अर्जदार करीता अधिवक्ता-
अँड.पवन जी परवाल
अर्जदार - १. श्रीमती विमलबाई केशव वानखडे
२. गजानन केशव वानखडे
नं. १ व २ रा. शिक्षक कॉलनी, नांदुरा
ता. नांदुरा जि. बुलडाणा
३. शशिकांत केशवराव वानखडे
रा. व्यंकटेश नगर वाटीके जवळ शेगाव
ता. शेगाव जि बुलडाणा
......विरुध्द........
गैरअर्जदार- कोणी नाही
मुंबई रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट (वारस हक्काचे प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील केशवराव विष्णुपंत वानखडे हे नांदुरा येथील रहिवाशी होते व ते दिनांक २५.१०.२०२४ रोजी नांदुरा येथेच मयत झाले आहेत. मयत केशवराव विष्णुपंत वानखडे हयांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच कायदेशिर वारस असल्याबाबतच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार हयांनी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी हया न्यायालयात अर्ज केला आहे. त्या अर्जाची सुनावणी ता. ३/२/२०२५ रोजी १०-३० वाजता होईल.

तरी या जाहीर नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, सदर प्रकरणी ज्यांना काही हरकती, आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी वरील तारखेस किंवा सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसाचे आत वि. न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून त्यांचे आक्षेप, हरकती सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही आक्षेप, हरकत नाही असे समजुन अर्जदारांना वारस हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दि.२३/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
दिनांक : २३/१२/२०२४

शिक्का
आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कोर्ट
नांदुरा, जि.बुलडाणा

RNINo-MAHMAR 2010/35857
महासागर खामगांव(बुलढाणा)
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

